**73% of 3 flyovers work at Kalanagar Junction attained; project likely to be complete by Dec 31, 2020**

**OCTOBER 11, 2020**
**Mumbai**

The Mumbai Metropolitan Region Development Authority(MMRDA) has been undertaking different infrastructure development projects in a bid to provide seamless travelling experience. As part of its goal, it has also initiated the work of three flyovers at Kalanagar Junction in Bandra (East) which is likely to be completed by December 31, 2020. So far about 73 per cent of the entire project works has been achieved.

The Kalanagar Nagar Junction is connected with the Western Express Highway and Bandra - Kurla connecting road, besides the other three roads which is causing huge traffic jam at any given point of time. It is one of the busiest signals in the suburbs.Therefore, the new flyovers will make the junction snarl free and ensure smooth passing of vehicles on the respective roads saving lot of time of motorists.

The total project cost is of Rs 103.73 crore and initial work order was given on January 2, 2017 to M/s Simplex Infrastructure Ltd. While the new sub contractor M/s RPF InfraProject Pvt Ltd was appointed on January 29, 2020 to replace M/s Simplex.

Besides, this project has also generated employment opportunities for skilled and unskilled workers. According to the MMRDA, everyday 81,788 skilled and 2,45,365 unskilled labourers are employed and undertaking the work.

------

Metropolitan Commissioner, MMRDA
R. A Rajeev:" The girder launching work of this project was undertaken late Night and interestingly, Honourable Cabinet Minister of Tourism and Environment Government of Maharashtra, Shri Aditya Thackeray was also present at that time. His presence has always built confidence among the workers and I take this opportunity to thank him for encouraging all of us. Moreover, because of honourable Minister's constant support and keen interest in the said project MMRDA has been efficiently undertaking the work and meet the deadline. Once open for public it will provide major connectivity to Mumbai region and will bring substantial development in infrastructure growth of the city."

(Dr. B.G. Pawar)
Jt. Metropolitan Commissioner

**प्रसिध्दी पत्रक**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मुंबई महानगर परिसराच्या पायाभूत सुविधांच्या विकासात मोठी भूमिका पार पाडली आहे. या पायाभूत सुविधांमध्ये अनेक उड्डाणपुलांचाही समावेश आहे आणि त्यामुळे रस्त्यांवर होणारी वाहतूक कोंडी कमी होण्यात सहाय्य झाले आहे.

त्याचाच भाग म्हणून कलानगर जंक्शन, वांद्रे(पूर्व), मुंबई येथे उड्डाणपूलाचे संकल्पना आणि बांधकाम प्रगतिपथावर आहे.

या उड्डाणपूलावर एकून तीन मार्गिका असणार आहेत.
1) मार्गिका- ब - वरळी - वांद्रे सागरी मार्गाकडून वांद्रे-कुर्ला संकुलाकडे जाण्यासाठी दोन पदरी मार्गिका. या मार्गिकेची लांबी 714.40 मीटर असूनव रुंदी 7.50 मीटर असणार आहे

2) मार्गिका - क - वांद्रे-कुर्ला संकुलाकडून वांद्रे - वरळी सागरी मार्गाकडे जाण्यासाठी दोन पदरी मार्गिका. या मार्गिकेची लांबी 604.10 मीटर आणि रुंदी 7.50 मीटर असेल.

3) मार्गिका - ड - धारावी जंक्शनकडून वांद्रे - वरळी सागरी मार्गाकडे जाण्यासाठी असणार आहे. ही मार्गिकाही स्वतंत्र आणि दोन पदरी असून ही येथे सिग्नल नसणार आहे.
या मार्गिकेची लांबी 310.10 मीटर व रुंदी 7.50 मीटर असेल.

या प्रकल्पाची एकूण किंमत रु.103.73 कोटी आहे. या कामाचा कार्यारंभ आदेश दि. 2 जानेवारी 2017 रोजी काढण्यात आला असून मे. सिम्प्लेक्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड हे याचे ठेकेदार आहेत. उपठेकेदाराची नियुक्ती दि. 29 जानेवारी 2020 रोजी करण्यात आली. उपठेकेदार मे. आरपीएफ इन्फ्राप्रोजेक्ट प्रा. लिमिटेड ही कंपनी आहे. हे काम 31 डिसेंम्बर 2020 पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

कलानगर जंक्शन येथे पश्चिम द्रुतगती महामार्ग व वांद्रे-कुर्ला जोडरस्त्यासह इतर तीन मार्ग येऊन मिळतात. त्यामुळे या ठिकाणी मोठी वाहतूक कोंडी होते. प्रस्तावित उड्डाणपुलामुळे कलानगर जंक्शनवरील वाहतूक सुरळीत होण्यास मदत होणार आहे. यामुळे वाहतुकीच्या वेळेत सुमारे 10 मिनिटांची बचत होईल असा अंदाज आहे.

कलानगर जंक्शन येथे 36 मीटर आणि 30 मीटर लांबीच्या लोखंडी तुळयांमध्ये दोन या अनिवार्य वक्राकार गाळे असून पश्चिम द्रुतगती मार्ग ओलांडण्यासाठी 43 मीटर व 30 मीटर लांबीचे लोखंडी तुळयांमधील दोन अनिवार्य गाळे आहेत.

या प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होईल. या प्रकल्पात 81788 मनुष्यबळ दिवसांचे कुशल कामगारांसाठी तर 245365 मनुष्यबळ दिवसांचे काम अकुशल कामगारांसाठी निर्माण होईल असा अंदाज आहे.

आतापर्यंत या प्रकल्पाचे 73 टक्के काम पूर्ण झाले असून 31 डिसेंबर 2020 पर्यंत हा प्रकल्प पूर्ण होणे अपेक्षित आहे.

या प्रकल्पाच्या तुळया चढवण्याचे महत्त्वाचे काम सुरू असताना मा. मंत्री पर्यावरण आणि पर्यटन विकास, श्री. आदित्यजी ठाकरे जातीने उपस्थित राहिले व त्यांनी साऱ्या कामगारांना प्रोत्साहन दिले या बद्दल आदित्यजींचा मी अत्यंत आभारी आहे, असे महानगर आयुक्त, श्री. आर. ए. राजीव यांनी म्हटले आहे. आदित्यजींचे सातत्यपूर्ण सहकार्य आणि उत्तेजन यामुळेच हा कलानगर जंक्शन उड्डाणपूल प्रकल्प नियोजित वेळेत आणि अत्यंत उत्तमप्रकारे पूर्ण होत आहे असे म्हणून महानगर आयुक्त राजीव पुढे असे म्हणाले की, कलानगर जंक्शन उड्डाणपूल नियोजित वेळेत पूर्ण होऊन कार्यान्वित होणे ही गोष्ट मुंबई महानगर विभाग विकास प्राधिकरणाला अभिमानास्पद गोष्ट असून याने मुंबई महानगराच्या पायाभूत सुविधांमध्ये मोठी भर पडणार ही समाधानाची गोष्ट आहे.











